## दीपाली चव्हाण आत्महत्या प्रकरणात श्रीनिवास रेड्डी विरोधातील गुन्हा रद्द

**नागपूर** – मेळघाटमध्ये २५ मार्च रोजी वनरक्षक दीपाली चव्हाण यांनी आत्महत्या केली होती. आत्महत्येपूर्वी दीपाली चव्हाण यांनी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये मानसिक छळाचा उल्लेख करण्यात आला होता. तसेच, क्षेत्रसंचालक श्रीनिवास रेड्डी यांचे देखील नाव या चिठ्ठीमध्ये होते. मात्र, दीपाली चव्हाण यांच्या आत्महत्येनंतर श्रीनिवास रेड्डी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला गुन्हा न्यायालयाने रद्द ठरवला आहे. तसेच, सुनावणी सुरू असलेले हे प्रकरण देखील बंद केले आहे. त्यामुळे दीपाली चव्हाण यांच्यासाठी लढा देणारे त्यांचे कुटुंबीय आणि सहकाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. दीपाली चव्हाण यांनी सर्व्हिस रिव्हॉल्वरने गोळी झाडून आत्महत्या केली होती.

# थोडक्यात

## बेलसर गावात झिका बाबत जनजागृती

**पुणे** – झिका विषाणूचा पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील बेलसर या गावात पहिला रुग्ण आढळल्यानंतर खळबळ उडाली होती. झिकाचा प्रादुर्भाव होवू नये यासाठी बेलसर व नजीकच्या पाच गावात युद्धपातळीवर उपयायोजना राबवून परिस्थिती आटोक्यात आणण्यात येत आहे. मात्र, परिसरातील गावात पुढील चार महिने महिला गर्भवती राहणार नाही, यासाठी प्रजननक्षम जोडप्यांमध्ये याविषयी जनजागृती करण्यात येत आहे. पुरंदर तालुक्यातील बेलसर येथे २९ जुलै रोजी राज्यातील पहिला झिका' विषाणूचा प्रादुर्भाव झालेला एक महिला रुग्ण आढळून आली होती. झिका प्रतिबंधासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात आल्याचे पुरंदर तालुक्याच्या आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला जाधव यांनी सांगितले. झिका विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णाच्या रक्तात किमान दोन आठवडे हे विषाणू राहतात.तर पुरुषांच्या वीर्यात हे विषाणू चार महिन्यापर्यंत जिवंत राहू शकतात. अशा विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात प्रजननक्षम जोडप्यांचे संबध येऊन महिला गर्भवती राहिल्यास त्या महिलेला होणाऱ्या बाळाच्या मेंदूची वाढ पूर्ण होत नाही. डोक्याचा आकार कमी होतो, वेळेच्या आधी संबधित महिला बाळंत होवू शकते, तसेच उपजत बाळाचा मृत्यू देखील होवू शकतो, असेही डॉ. जाधव म्हणाल्या.

## पतीची कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या

**नागपूर** – पती वारंवार चारित्र्यावर संशय घेत असल्याने दाम्पत्यात भांडण झाले. या भांडणात पत्नीने कुऱ्हाडीने घाव घालून पतीची हत्या केली. ही घटना काटोल पोलिस ठाण्यांतर्गत येणार्या खंडाळा हेटी येथे घडली. फुलवंती सुकलसिंग सकोम (वय ४४) असे आरोपी पत्नीचे तर सुकलसिंग मखनसिंग सकोम (वय ४९) असे पतीचे नाव आहे. सुकलसिंग हा फुलवंतीच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. यामुळे ती त्रस्त झाली होती. रात्री दोघांचेही भांडण झाले. राग अनावर झाल्याने फुलवंतीने घरातील कुऱ्हाड घेतली व पतीच्या डोक्यावर, मानेवर सपासप वार करून त्याची हत्या केली. घटनेची माहिती उपसरपंच हेमेंद्र मुरलीधर चरडे यांना समजताच त्यांनी ही माहिती काटोल पोलिसांना दिली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीविरोधात भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदवून तिला अटक केली. तिच्या घरातून गुन्ह्यात वापरलेली कुऱ्हाड जप्त करण्यात आली.

## भारत विकास परिषद ७५ दीप प्रज्वलित करणार

**नागपूर** – १५ ऑगस्ट २०२१ रोजी भारतीय स्वातंत्र्य मिळाल्याला ७४ वर्ष पूर्ण होत असून ७५ वे वर्ष सुरु होत आहे. या निमित्ताने देशभर आनंदोत्सव साजरा होत आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी बरोबर रात्री १२ वाजता देशाला स्वातंत्र्य मिळाले होते याची आठवण ठेऊन भारत विकास परिषद या राष्ट्रीय संघटनेच्या विदर्भ प्रांतातील सर्व शाखा नागपुरातील शहीद स्मारकाजवळ एकत्र जमून मिरवणुकीने संविधान चौकात जाऊन आनंदोत्सव साजरा करणार आहेत.या कार्यक्रमात भारत विकास परिषदेचे सर्व कार्यकर्ते गोवारी स्मारकाजवळील शहीद स्मारकाजवळ १४ ऑगस्ट २०२१ रोजी रात्री ११.३० वाजता एकत्र जमणार आहेत. तिथून तिरंग्यासह मिरवणुकीने पायी चालत संविधान चौकात पोहोचतील त्या ठिकाणी ठीक रात्री १२ वाजता ७५ दीप प्रज्वलित केले जातील आणि भारत माता पूजन केले जाईल. यावेळी निवृत्त कर्नल विपीन वैद्य आणि नागपूर नगरीचे महापौर दयाशंकर तिवारी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

## अतिवृष्टीबाधित गावांमध्ये संरक्षक भिंतीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी

**कराड** – अतिवृष्टी व पूरामुळे कृष्णा नदीकाठावरील शेतीसह गावांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे बाधित गांवासाठी संरक्षक भिंत बांधणे आवश्यक असल्याने त्यासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी खा.श्रीनिवास पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री ना.जयंत पाटील यांच्याकडे केली. ना.जयंत पाटील हे शुक्रवारी सातारा जिल्हा दौऱ्यावर होते. त्यांनी गोटे, कराड येथील खा.श्रीनिवास पाटील यांच्या लोकसेवा जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान अतिवृष्टीने जिल्ह्यात झालेले नुकसान, त्याबाबत कराव्या लागणाऱ्या उपाययोजना व विविध विकासकामा संदर्भात दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. यावेळी सारंग पाटील उपस्थित होते.

## विरोधकांचा माझा राजकीय प्रवास संपवण्याचा डाव – संजय राठोड

**यवतमाळ** – पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणामुळे वनमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागलेले शिवसेना नेते संजय राठोड पुन्हा एकदा अडचणीत सापडले आहेत. संजय राठोड यांच्याविरोधात एका महिलेने यवतमाळ पोलिसांकडे तक्रार केली आहे. संजय राठोड यांनी माझ्याकडे शरीरसुखाची मागणी केली असल्याची लेखी तक्रार महिलेने केली आहे. दरम्यान संजय राठोड यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून या आरोपांना उत्तर दिले आहे. भाजपा नेत्या चित्रा वाघ यांनी ट्वीट करत संजय राठोड यांच्यावर महिलेने केलेल्या आरोपाची माहिती दिली आहे. शिवसेना आमदार आणि माजी मंत्री संजय राठोड यांच्यावर शरीरसुखाची मागणी केल्याची लिखित सविस्तर तक्रार एका भगिनीने यवतमाळ पोलिसांना पोस्टाने पाठवली आहे. त्यावेळी मंत्री असल्यामुळे तक्रारीची दखल घेतली गेली नाही. तसेच आजही संजय राठोड माझ्याकडे शरीरसुखाची मागणी करत लैंगिक छळ करतात, असे त्यात म्हटले आहे अशी माहिती चित्रा वाघ यांनी ट्वीटमध्ये दिली आहे. यासोबत चित्रा वाघ यांनी यावेळी तक्रारीच्या पत्राचे दोन फोटोही पोस्ट केले आहेत.

## ससून रुग्णालयातील डॉक्टरांचा सन्मान

**पुणे** – कोरोना महामारीच्या काळात आपल्या जीवाची पर्वा न करता रुग्णसेवेसाठी सातत्याने अविरत झटणाऱ्या ससून रुग्णालयातील १९ डॉक्टर, आणि आरोग्य कर्मचारी यांचा इनरव्हील क्लब, पुणे मिडटाऊन यांच्या वतीने नुकताच सन्मान करण्यात आला. यावेळी ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.मुरलीधर तांबे यांचा विशेष गौरव करण्यात आला. हा सत्कार ससून रुग्णालयाच्या समाजाभिमुखतेची पोचपावती असल्याची भावना डॉ. तांबे यांनी यावेळी व्यक्त केली.

# साताऱ्यात डेंग्यू, चिकन गुनियाचे थैमान

## करडसह पाच तालुक्यांत कोरोनाचा पुन्हा कहर

**कराड / वार्ताहर**

जिल्ह्यातील कोरोना रूग्णांची वाढती संख्या आटोक्यात आणण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्न करत असून नवीन डेल्टा व्हेरिअंट जिल्ह्यात येवू नये असे प्रयत्न सुरू असतानाच,दुसरीकडे जिल्ह्यात डेंग्यू आणि चिकन गुनियाच्या आजाराने डोके वर काढले आहे.या आजारांची रूग्णसंख्या आठवडाभरात अनपेक्षितपणे वाढल्याने जिल्ह्यातील नगरपालिका,ग्रामपंचायतींसह प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील ताण आणखी वाढला आहे.

दरम्यान, गेल्या दोन दिवसांपासून जिल्हा प्रशासनाला प्राप्त होत असलेल्या कोरोना रूग्णांच्या अहवालांतील आकडेवारीवरून कोरोना बाधित रूग्णांची कमी होत चाललेली संख्या पुन्हा वाढू लागल्याने सातारा जिल्हा पुन्हा हादरला आहे. मात्र त्यातही जिल्ह्यातील कराडसह सातारा,फलटण,खटाव व माण या पाच तालुक्यांतील कोरोना रूग्णवाढीची आकडेवारी आणखी चिंताजनक ठरत आहे.सातारा जिल्ह्यातील या स्थितीला सावरण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असतानाच शेजारच्या पुणे जिल्ह्यात डेल्टाचे आणखी तीन रूग्ण वाढले आहेत,त्यांच्या संसर्गातून जिल्ह्यात या व्हेरिअंटचा शिरकाव न होण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.

शुक्रवारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या अहवालांत जिल्ह्यामध्ये कोरोनाचे तब्बल १०९० नवे रूग्ण वाढले असून रूग्णवाढीची हजारी पार केलेली ही आकडेवारी सर्वांच्याच चिंतेत भर टाकणारी आहे.आज सकाळी संपलेल्या चोवीस तासांत १४ हजार ५०५ संशयितांच्या चाचण्या करण्यात आल्या होत्या,त्यातील १०९० रूग्ण बाधित आहेत. सातारा जिल्ह्यामध्ये कोरोनाची दुसरी लाट सुरू झाल्यापासून कराड आणि सातारा तालुक्यात रूग्णवाढीचा कहर कायम आहे.जिल्ह्यातील इतर सर्व तालुके जुलै महिन्यात सावरले असताना कराड,सातारा या प्रमुख तालुक्यांतील वाढ मात्र दोन,चार दिवसांचा अपवाद वगळता दिडशेच्या खाली आलेलीच नाही.शुक्रवारी आलेल्या तालुकानिहाय अहवालांत कराडला बाधित वाढ शंभरच्या खाली आल्याचे दिसते.मात्र फलटण १८६,खटाव १७९,माण १२२ अशी रूग्णवाढ झाली असल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे.सातारा तालुक्यात जैसे थे रूग्णवाढ असून काल १७१ नव्या रूग्णांची भर पडली आहे.

### शहरातील पेठांमध्येही डेंग्यूचे रुग्ण

कराड तालुक्यातील कोरोना रूग्णवाढ कायम असतानाच तालुक्यातील कोयना वसाहत, आटके, वाठार, कोळेवाडी, कासारशिरंबे, उंब्रज, जिंती या गावांत डेंग्यूचे रूग्ण जास्त आढळल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. सातारा तालुक्यातील शाहूपुरी, क्षेत्रमाहुली, विलासपूर या भागांसह शहरातील काही पेठांमधेही डेंग्यूचे रूग्ण वाढत आहेत.

### डेल्टाचे आणखी तीन रूग्ण

पुण्यात डेल्टा प्लसचे रूग्ण आढळल्याने सिमेवरील जिल्हावासियांनी या संकटाला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. राज्यात गेल्या आठवड्यात डेल्टा प्लसचे ४५ रूग्ण आढळले होते.राज्यातील डेल्टा प्लसची संख्या ६५ झाली आहे.या ६५ डेल्टा प्लस रुग्णांपैकी ३२ पुरुष असून ३३ स्त्रिया आहेत.नव्याने आढळलेले २० रुग्ण हे मुंबई ७,पुणे ३, नांदेड,गोंदिया,रायगड,पालघर प्रत्येकी २ आणि चंद्रपूर,अकोला येथे प्रत्येकी १ रुग्ण आढळून आला आहे.

## पंतप्रधानांकडून पद्मविभुषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या कार्याचा गौरव

**पुणे / वार्ताहर**

छत्रपती शिवरायांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने सुराज्य होते. त्यात सुशासन होते. दलित, मागासवर्गांच्या वेदनांचा हुंकार त्यात होता.महाराजांची शिकवण आत्मसात करण्याची शक्ती मिळावी, ही माझी प्रार्थना आहे. या शिवछत्रपतींचे चरित्र आपल्या रसाळ वाणी लेखणीने प्रत्येकाच्या मनात पोहोचवण्याचा प्रयत्न शिवशाहिरांनी गेल्या साडेसहा दशकांत केला आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शतकवीर पद्मविभुषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या कार्याचा गौरव केला

राज्यासह देश-विदेशातील साडेसहा दशकांतील पिढ्यांना शिवछत्रपतींच्या दैदिप्यमान चरित्राची सखोल ओळख करून देणारे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी आज शताब्दीत पदार्पण केले. त्याबद्दल या शिवसाधकाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवर आणि समस्त पुणेकरांतर्फे हृद्य सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

फक्त शिवराय आणि शिवचरित्र यावर गेली ८० वर्षे बोलणारे बाबासाहेब हे स्वत: एक विश्वविक्रम आहेत अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांचा गौरव केला आहे.

शिवछत्रपती हा पुरंदरे यांचा ध्यास आहे. त्या ध्यासात, प्रेरणेत राष्ट्रभक्ती आहे. अशा शब्दांत डॉ. मोहन भागवत यांनी पुरंदरे यांच्या कार्याचा गौरव केला.शिवाजी महाराजांच्या चरित्रातून मला क्रिकेटमध्येही प्रेरणा मिळाली आहे. अशी भावना सचिन तेंडूलकर यांनी व्यक्त केली.

---

## जाहीर सूचना

श्री. रामनिरंजन अग्रवाल जजोडिया ऊर्फ रामनिरंजन सग्रवाल जजोडिया हे ओम दरिया महाल सीएचएस लि., ८०, नेपिअन सी रोड, मुंबई ४००००६ च्या ११व्या मजल्यावर स्थित फ्लॅट क्र.८१ चे मालक आणि चांगले आणि पूरक हक्कदार आहेत आणि सदर सोसायटीचे सभासद व शेअरधारक आहेत. श्री. रामनिरंजन अग्रवाल जजोडिया यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता २२.०७.२००१ रोजी निधन झाले. श्रीम.भगवतीदेवी रामनिरंजन अग्रवाल (पत्नी) यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता ०१.०१.२०१९ रोजी निधन झाले. श्री. कृष्णकुमार अग्रवाल जजोडिया (मुलगा) यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता १५.०३.२०२१ रोजी निधन झाले. त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार, सौ.इंदु अशोक झुनझुनवाला यांनी आता फ्लॅट क्र.८१च्या त्यासह शेअर्स आणि हितसंबंधाचे हस्तांतरणासाठी सोसायटीला अर्ज केला आहे. सोसायटी याद्वारे सोसायटीच्या भांडवल/ मिळकतीमधील मयत सभासदाचे सदर शेअर्स आणि हितसंबंधाचे हस्तांतर होण्यास वारस किंवा कायदेशीर वारसदार किंवा इतर दावेदार/आक्षेपदार यांच्याकडून दावे किंवा आक्षेप असल्यास ते सदर सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ (पंधरा) दिवसात सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्या/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्यांच्या प्रतींसह मागवित आहे.

वर दिलेल्या मुदतीत जर दावे/ आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीमधील दिलेल्या मार्गाने सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाचे शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतर करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर, सोसायटीच्या भांडवल/ मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदीनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधीची प्रत दावेदार/ आक्षेपकांद्वारे निरीक्षणासाठी सोसायटीचे कार्यालय/ सोसायटीचे सन्मा. सचिव यांचेकडे स.१०.३० ते सायं.६.०० च्या मध्ये सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून तिच्या कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत उपलब्ध आहे.

**ओम दरिया महाल सीएचएस लि.**
च्या वतीने आणि करिता
**सही/-**
ठिकाण : मुंबई **अध्यक्ष/सचिव**
दिनांक : १४/०८/२०२१

---

### नमुना-झेड

नियम १०७ चा उपनियम ११(ड-१)

## स्थावर मालमत्तेकरिता ताबा सूचना

ज्याअर्थी खाली सही करणार हे गणराज सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई. चे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये वसुली अधिकारी असून त्यांनी दि. ३०/११/२०१७ रोजी श्री. सुनिल लक्ष्मीनारायण वर्मा या कर्जदारास/ जामिनदारास मागणी (डिमांड) नोटीस पारीत करून नोटीशीतील रक्कम रु. १,१५,२९०/- (अक्षरी एक लाख पंधरा हजार दोनशे नव्वद रुपये मात्र) परत करण्यासाठी नोटीस मिळाल्याच्या तारखेनुसार कळविले होते. व कर्जदारांनी सदर रक्कम परत करण्यास कसूर केली असल्यामुळे खाली सही करणार यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजी जप्तीची नोटीस पाठवून खाली नमूद मालमत्ता जप्त केलेली आहे.

कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यास कसूर केल्याने येथे सदर कर्जदार/ जामिनदार व सर्व जनतेला सूचना देण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा-सूचना दि. ३/८/२०२१ रोजी त्याना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चा उपनियम ११ (ड-१) नुसार असलेल्या अधिकारात घेतला आहे.

विशेषतः सदर कब्जेदारांना व इतर सर्व जनतेला येथे सावधगिरीची सूचना देण्यात येते की, सदर मालमत्तेसंबंधी कोणतेही व्यवहार करू नयेत व सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार गणराज सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई, यांचे बोजा दिनांक ३०/०६/२०२१ अखेर व्याजासह रक्कम रूपये १,४५,२४१/- (अक्षरी रुपये एक लाख पंचेचाळीस हजार दोनशे एकेचाळीस रुपये मात्र) त्यावरील व्याज रकमेच्या अधिन राहील.

**स्थावर तारण मालमत्तेचे वर्णन/तपशिल**

वास्तवाचा पत्ता : लक्ष्मीनारायण सायकल मार्ट, गाला नं. ३, राधाबाई निवास, स्टार कॉलनी, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)- ४२१ २०१.

दिनांक : ३/८/२०२१
वेळ : ०१.०० दुपारी
ठिकाण:नायगाव, दादर, मुंबई-१४

**सही/-**
**श्री. बी. एन. गायकवाड**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**सहकारी संस्था**
**द्वारा : गणराज सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई**

---

# Future Lifestyle Fashions Limited

CIN: L52100MH2012PLC231654
Regd. Off.: Knowledge House, Shyam Nagar, Off Jogeshwari-Vikhroli Link Road, Jogeshwari (East), Mumbai - 400060.
Tel. No.: +91 22 4055 2200; Fax No. : +91 22 4055 2201
Website: www.futurelifestyle.in; Email: investorrelations@futurelifestyle.in

**Extracts of Unaudited Financial Results for the Quarter ended 30 June 2021**

(₹ in Crore)

| Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Quarter Ended** | Quarter Ended | Year Ended | **Quarter Ended** | Quarter Ended | Year Ended |
| | **30-06-2021** | 30-06-2020 | 31-03-2021 | **30-06-2021** | 30-06-2020 | 31-03-2021 |
| | **Unaudited** | Unaudited | Audited | **Unaudited** | Unaudited | Audited |
| Total Income from Operations | **275.87** | 90.30 | 2,210.50 | **309.17** | 96.38 | 2,327.08 |
| Net profit before tax | **(324.93)** | (329.12) | (870.75) | **(353.89)** | (352.76) | (940.36) |
| Net profit after tax | **(324.93)** | (329.12) | (871.57) | **(348.08)** | (352.95) | (933.35) |
| Equity Share Capital (Face Value ₹ 2 per Share) | **40.35** | 40.35 | 40.35 | **40.35** | 40.35 | 40.35 |
| Reserve excluding revaluation reserves | | | 697.78 | | | 660.88 |
| Earnings Per Share (Face Value ₹ 2 per Share) | | | | | | |
| Basic (₹ ): | **(16.09)** | (16.30) | (43.23) | **(17.24)** | (17.48) | (46.28) |
| Diluted (₹ ): | **(16.09)** | (16.30) | (43.23) | **(17.24)** | (17.48) | (46.28) |

Note: The above is an extract of the detailed format of the financial results for the Quarter ended 30 June 2021, filed with Stock Exchanges, under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India (Lisiting Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results for the Quarter ended 30 June 2021 is availbale on the websites of the Stock Exchanges, viz., www.nseindia.com and www.bseindia.com and on the Company's website i.e., www.futurelifestyle.in.

For Future Lifestyle Fashions Limited

Place : Mumbai
Date : 13 August 2021

Vishnuprasad M
Managing Director

---

ANAND RATHI

**आनंद राठी ग्लोबल फायनान्स लि.** एक्स्प्रेस झोन, ए विंग, १०वा मजला, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ऑबेरॉय मॉल समोर, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६३

## ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः खालील कर्जदार/हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या परिशिष्टातील स्थावर मिळकत ही आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड (''एआरजीएफएल'') (तारण धनको) कडे इतर बाबीसह तारण आहे, जिचा कब्जा एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती खालील नमूद कर्जदार/हमीदारांकडून परिशिष्टात विशेषतः नमुद केलेली एकूण रक्कम आणि वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील संविदात्मक व्याज आणि इतर खर्च आणि प्रभाराच्या वसुलीसाठी 'जे आहे जेथे आहे' आणि 'जे आहे जसे आहे' आणि 'जे काही आहे तेथे आहे' तत्त्वाने परिशिष्टात विशेष नमुद तारखे रोजीस वेबसाईट https://sarfaesi.auctiontiger.net द्वारे ऑनलाईन ई-लिलावाद्वारे विकण्यात येणार आहेत.

| | |
|---|---|
| **कर्जदारांचे नावः**<br>**श्री. विनय सुंदर अवत्रामणी**<br>**फ्लॅट क्र. ७, आकाश गंगा ब्रीच कॅण्डी, वार्डन रोड, ग्रॅण्ट रोड, मुंबई: ४०० ०२६** | **सहकर्जदारांचे नावः**<br>**सौ. वीणा सुंदर अवत्रामणी**<br>**फ्लॅट क्र. ७, आकाश गंगा ब्रीच कॅण्डी, वार्डन रोड, ग्रॅण्ट रोड, मुंबई: ४०० ०२६** |
| **परिशिष्टः फ्लॅट क्र. ७, आकाश गंगा ब्रीच कॅण्डी, वार्डन रोड, ग्रॅण्ट रोड, मुंबई: ४०० ०२६, महाराष्ट्र.** | |
| **थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार सह त्यावरील पुढील व्याज आणि खर्च)** | **रु. ७,७३,३४,२१०/- (रूपये सात करोड त्र्याहत्तर लाख चौतीस हजार दोनशे दहा मात्र)** |
| **लिलावाची तारीख** | **२८ सप्टेंबर, २०२१** |
| **राखीव किंमत** | **रु. २०,४०,००,०००/- (रूपये वीस करोड चाळीस लाख मात्र)** |
| **इसारा अनामत रक्कम** | **राखीव किंमतीच्या १०%** |
| **किमान बोली वाढीची रक्कम** | **रु. १०,०००/-** |
| **इच्छुक खरेदीदारांसाठी मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ** | **२१ सप्टेंबर, २०२१<br>स. १० ते दु. ४.००** |
| **केवायसी/इअरचा पुरावा इ. सह निविदा प्रपत्र सादर करण्याची तारीख आणि वेळ** | **केवायसीसह २४ सप्टेंबर, २०२१<br>दु. ४.०० पर्यंत** |
| **ऑनलाईन प्रस्ताव उघडण्याची तारीख आणि वेळ** | **२८ सप्टेंबर, २०२१<br>स. १०.०० आणि दु. १.०० दरम्यान** |

**टिपः इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलाव प्रक्रियेच्या संदर्भातील तपशीलवार अटी आणि शर्तीकरिता आनंद राठी ग्रूपची वेबसाईट www.rathi.com भेट देऊ शकतात.**

सदर प्रकाशन हे वरील कर्जदार/हमीदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ८ (६) आणि ९(१) अन्वये विहित ३० दिवसांची सूचना सुद्धा आहे.

ई-लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीकरीता, कृपया तारण धनकोंच्या वेबसाईट www.rathi.com https://sarfaesi.auctiontiger.net मध्ये पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

**दिनांकः १३ ऑगस्ट, २०२१ ठिकाणः मुंबई प्राधिकृत अधिकारी (आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड)**

---

# Triumph International Finance India Limited

Oxford Centre, 10 Shroff Lane, Colaba Causeway, Colaba, Mumbai - 400 005.

**Statement of Standalone & Consolidated Unaudited Financial Results For The Quarter Ended June 30, 2021**

**(Rs. In Lacs)**

| Sr. No. | Prepared in compliance with Indian Accounting Standards (Ind-AS)<br>Particulars | Consolidated | | | | Standalone | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended June 30, 2021 (Unaudited) | Quarter Ended March 31, 2021 (Audited) | Corresponding Quarter Ended in Previous Year June 30, 2020 (Unaudited) | Year Ended March 31, 2021 (Audited) | Quarter Ended June 30, 2021 (Unaudited) | Quarter Ended March 31, 2021 (Audited) | Corresponding Quarter Ended in Previous Year June 30, 2020 (Unaudited) | Year Ended March 31, 2021 (Audited) |
| 1. | Income | | | | | | | | |
| | a) Revenue from Operations | - | - | - | - | - | - | - | - |
| | b) Other income | 5.26 | 282.55 | 15.37 | 327.76 | 5.26 | 282.55 | 15.37 | 327.76 |
| | Total Income | **5.26** | **282.55** | **15.37** | **327.76** | **5.26** | **282.55** | **15.37** | **327.76** |
| 2. | Expenses | | | | | | | | |
| | a) Cost of materials consumed | - | - | - | - | - | - | - | - |
| | b) Purchase of stock-in-trade | - | - | - | - | - | - | - | - |
| | c) Change in inventories of stock in trade | - | - | - | - | - | - | - | - |
| | d) Employee benefits expense | - | - | - | - | - | - | - | - |
| | e) Depreciation and amortisation expense | - | - | - | - | - | - | - | - |
| | f) Finance costs | - | - | - | - | - | - | - | - |
| | g) Other expenses | 4.70 | 16.99 | 0.16 | 19.70 | 4.46 | 16.95 | 0.13 | 19.49 |
| | h) Investments Written off | - | - | - | - | - | - | - | - |
| | Total Expenses | 4.70 | 16.99 | 0.16 | 19.70 | 4.46 | 16.95 | 0.13 | 19.49 |
| 3. | Profit/(Loss) before Tax (1-2) | **0.56** | **265.56** | **15.21** | **308.06** | **0.80** | **265.60** | **15.24** | **308.27** |
| 4. | Tax expense | - | - | - | - | - | - | - | - |
| 5. | Net Profit/(Loss) for the period (3 - 4) | **0.56** | **265.56** | **15.21** | **308.06** | **0.80** | **265.60** | **15.24** | **308.27** |
| 6. | Other Comprehensive Income | | | | | | | | |
| | a) Items that will not be reclassified subsequently to profit or loss | - | - | - | - | - | - | - | - |
| | b) Items that will be reclassified subsequently to profit or loss | - | - | - | - | - | - | - | - |
| 7. | Total Other Comprehensive Income(a+b) | - | - | - | - | - | - | - | - |
| 8. | Total Comprehensive Income for the period (5+6) | **0.56** | **265.56** | **15.21** | **308.06** | **0.80** | **265.60** | **15.24** | **308.27** |
| 9. | Paid-up equity share capital (Ordinary shares of Rs.10 each) | 750 | 750 | 750 | 750 | 750 | 750 | 750 | 750 |
| 10. | Other Equity | - | - | - | (8956.71) | - | - | - | (8690.36) |
| | Earning Per share- | | | | | | | | |
| | a) Basic | 0.01 | 3.54 | 0.20 | 4.11 | 0.01 | 3.54 | 0.20 | 4.11 |
| | b) Diluted | 0.01 | 3.54 | 0.20 | 4.11 | 0.01 | 3.54 | 0.20 | 4.11 |

Notes:
1. The above results were reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 13th August, 2021 and subject to a limited review by the Statutory Auditors of the Company.
2. The financial results of the company are prepared in accordance with the Indian Accounting Standards(Ind-AS) as prescribed under section 133 of the Companies Act, 2013 read with Rule 3 of the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 and Companies (Indian Accounting Standards) Amendment Rules, 2016.
3. The Securities and Exchange Board of India have cancelled the registration of the Company as a Stock Broker.
4. Other Income includes interest on fixed deposits with ICICI Bank and dividend income of Rs. 3.03 lacs and 0.70 lacs respectively has been accounted as per Form 26AS.
5. Figures for the previous periods/year are re-classified/rearranged/re-grouped, wherever necessary.

For and on behalf of the Board
**of Triumph International Finance India Limited**
**Nagesh Kutaphale**
**Director**

**Place : Mumbai**
**Date : August 13, 2021**

---

IndiaRF
A Piramal Enterprises & Bain Capital Credit Partnership

## इंडिया रिसर्जंन्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड

३ रा मजला, पिरामल टॉवर, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.
दूर. ०२२-६८६०८५००/६८६०८५०१
सीआयएन : U67190MH2016PTC272471

## परिशिष्ट ४-ए (नियम ८(६) तरतूद) स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलावाकरिता जाहीर सूचना

सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८(६) च्या तरतूदी सहवाचन सरफैसी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: खालील नमूद कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेची इंडिया रिसर्जंन्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड (इंडिया आरएफ/ प्रतिभूत धनको) यांना गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा प्रत्यक्ष ताबा इडियन आरएफ/ प्रतिभूत धनको यांच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे दि. ३ डिसेंबर, २०२० रोजी जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जेथे कुठे आहे तत्त्वावर अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत संक्षिप्त विवरणानुसार करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **खात्यांचे नाव/ कर्जदार/ हमीदार** | नवकार वूड, निलेश कुमार फारिया, प्रेमजी एम. फारिया, मणिबेन प्रेमजी फारिया, नवकर असोसिएट्स |
| **मालमत्तेचे मालक यांचे नाव** | निलेश कुमार फारिया, मणिबेन प्रेमजी फारिया |
| **मालमत्तेचा तपशील** | मरोळ को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट, गाव मरोळ, जेबी नगर, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०५९ येथील त्यावरील रचनांसह मोजमापित अंदाजे ४६१० चौ. फूट सर्व्हे क्र. ४८ (भाग), हिस्सा क्र. १ (भाग) यांच्यासह भाडेधारक कम्पार्टमेंट प्लॉट क्र. १३४ प्लॉट क्र. २४/२५ मोजमापित ४८६ चौ. यार्ड (समतुल्य ४२१ चौ. मीटर ४५३९ चौ. फूट) धारक सर्व तो भाग व भूखंड. |
| **ताबा दिनांक व स्वरूप** | प्रत्यक्ष ताबा दि. ३ डिसेंबर, २०२० |
| **थकित रक्कम (चालू तारीख अनुसार) व मागणी सूचना दिनांक** | रु. ६,६३,४७,२०७ दि. १५.०१.२०१९ अनुसार मागणी सूचना<br>रु. ९,६३,८८,२३० दि. ३१.०७.२०२१ च्या तारखेनुसार |
| **राखीव मूल्य (रु.)** | **रु. ७,२३,००,००० (रु. सात करोड तेवीस लाख मात्र)** |
| **इअर/ बोली विस्तार रक्कम** | इअर- रु. ७२,३०,००० (रु. बाहत्तर लाख तीस हजार मात्र)<br>बोली विस्तारित मूल्य - रु. सात लाख |
| **बोली सादरीकरणाची अंतिम तारीख** | दि. १७ सप्टेंबर, २०२१ |
| **ई-लिलावाची तारीख व वेळ** | **दि. २० सप्टेंबर, २०२१ रोजी १२.०० वा.** |
| **ज्ञात असलेले काही अडथळे** | काही नाही |

*पुढील व्याज जे लागू असेल, प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदी व उद्भवलेले व्याज हे सर्व प्रदानाच्या तारखेपर्यंत व पूर्ततेपर्यंत.

* वरील तक्त्यामधील या व्यतिरिक्त असलेले अडथळे हे प्रतिभूत धनको यांच्या प्राधिकृत अधिकारी यांना ज्ञात नाही आहेत. इच्छुक बोलीदार यांनी सदर स्थावर मालमत्तेच्या अडथळे, हक्क यांच्या संबंधात त्यांच्या स्वत:च्या मालकी अनुसार करावे. प्राधिकृत अधिकारी/ प्रतिभूत धनको हे कोणतेही तिसरे पक्ष दावे/ हक्क/ थकबाकी याकरिता जबाबदार नसतील.

**अटी आणि शर्ती :**

१. ई-लिलाव/बोली विक्री ऑनलाइन ईलेक्ट्रॉनिक बोली मार्फत पोर्टल **https://www.bankauctions.in** वर उपलब्ध आहे. बोलीदारांनी कृपया ई-लिलाव विक्री कार्यक्रमामध्ये भाग घेण्यापूर्वी विस्तृत अटी व प्रक्रिया पाहावी.

२. प्रतिभूत मालमत्ता राखीव मूल्याच्या खाली विकली जाणार नाही. सर्व सांविधिक थकबाकी/जप्ती प्रभार/इतर थकबाकीसह नोंदणी प्रभार, मुंद्राक, शुल्क, कर यशस्वी बोलीदाराने भरायचे आहेत.

३. स्थावर मालमत्तेची राखीव मूल्य (आरपी) खाली विक्री करण्यात येईल व लिलाव आयोजित अर्थात मे. ४क्लोजर एजन्सी आयोजित करण्याद्वारे लिलाव प्रक्रियेच्या दरम्यान बोली व्यतिरिक्त आरपी आमंत्रित करावी.

४. इच्छुक बोलीदारांनी बोली सादरीकरणाच्या अंतिम तारीख व वेळेपूर्वी त्यांचे इसारा रक्कम ठेव (इअर) एलेक्सा रिझॉल्युशन ॲडवायजर एलएलपी यांना इंडिया आरएफ प्राधिकृत सर्व्हिस प्रदाते त्यांचे कार्यालय पत्ता **एडब्ल्यूएफआयएस, युनिट क्र. ३०४, ३ रा मजला, अदानी इन्सपायर बीकेसी, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, मुंबई ४०००५१ येथे डिमांड ड्राफ्ट/ एनईएफटी/ आरटीजीएस/ पे ऑर्डर मार्फत इंडिया रिसर्जेन्स एआरसी ट्रस्ट २, एचडीएफसी बँक लिमिटेड, खाते क्रमांक ५७५००००३४०६९९, आयएफएससी कोड एचडीएफसी०००६० येथे मुंबई येथे प्रदान करावे. कृपया नोंद घ्यावी की चेक इअर रक्कमेच्या स्वरूपात स्विकृत केले जाणार नाहीत.**

५. इच्छुक बोलीदारांनी खालील दस्तावेजांची प्रत प्राधिकृत अधिकारी श्री. हर्षवर्धन कदम (मो. क्र. ९८१९०५८००३/harshwardhan.kadam@indiaarf.com) वर **ए.** डिमांड ड्राफ्ट/ आरटीजीएस/ पे ऑर्डर तपशील इअरच्या स्वरूपात फोटोकॉपी) रक्कम प्रदान केलेली प्रत सादर करावी. **बी.** केवायसी व पत्ता पुरावा जसे पॅन कार्ड, व्होटर आयडी कार्ड/ ड्रायव्हींग लायसन्स/ पासपोर्ट/ आधार कार्ड आदी सेल्फ अटेस्टेड प्रत जोडावी **सी.** बोलीदारांचे नाव, संपर्क क्र., पत्ता, ईमेल आयडी. **डी.** बोलीदारांचे खाते तपशील इअर ऑनलाइन परतावा करताना.

६. पोस्ट रजिस्ट्रेशन (केवळ वेळ) बोलीदारांद्वारे इच्छुक बोलीदार वेब पोर्टल पर वरील निर्देशित दस्तावेजांचा तपशील अपलोड करावा.

७. इच्छुक बोलीदारांनी त्यांचे नाव पोर्टल **https://www.bankauctions.in** वर नोंदणीकृत करावे व निशुल्क त्यांचा युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. सदर प्रस्तावित बोलीदारांच्या आक्षेपा व्यतिरिक्त ऑनलाइन ट्रेनिंग **ई-लिलाव एजन्सी आयोजित लिलाव/ सर्व्हिस प्रदाते नावे मे. ४क्लोजर, हैंदराबाद, दूर. क्र. ०८१४२०००६२/६५/६६ व ईमेल info@bankauctions.in संपर्क व्यक्ती : विकास कुमार : ०८१४२०००८०९, ०८०७६४२७३८३, ईमेल vikas@bankauctions.in मार्फत ऑनलाइन प्रापत करावे** व कोणत्याही मालमत्ता संबंधातील चौंकशीकरिता प्राधिकृत अधिकारी (तपशील पूर्वीचा) कार्यालयीन वेळेच्या आत सोमवार ते शनिवार दरम्यान संपर्क साधावा. प्राधिकृत अधिकारी/ प्रतिभूत धनको वा एजन्सी यांनी ई-लिलाव इव्हेंटमध्ये सहभागी होण्याकरिता तांत्रिकीरित्या पात्र असावे व इच्छुक बोलीदारांचे कोणतेही इंटरनेट नेटवर्क प्रॉब्लेम याकरिता जबाबदार नसतील.

८. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार मिळकत/तींवर तेथे बोजा नाही. तथापि इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या
मिळकत/तींचे नामाधिकार, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात ही काही घटक नाही आणि सादरीकरण किंवा वचन मानण्यात येऊ नये.

९. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही. विक्रीसाठी ठेवलेल्या मिळकत/तींच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर कोणतेही दावे विचारात
घेतले जाणार नाहीत. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार मिळकत/तींवर तेथे मिळकत कर, सोसायटी थकबाकी इ. असा बोजा नाही, तथापि ओमकारा एआरसी कोणतीही सांविधिक थकबाकी/बोजा/
थकीत कर काही असल्यास यासाठी जबाबदार राहणार नाही. इच्छुक बोलीदारांनी मिळकतीचा बोजा, नामाधिकाराच्या संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे, तपासणे आणि स्वत:ची खात्री करणे आवश्यक आहे. मिळकतीचे काटेकोरपणे वरील नमूद तारीख आणि वेळी निरीक्षण करता येईल. इच्छुक पक्षांनी कृपया मालमत्ता व अन्य तपशील पडताळणी करावी. प्रतिभूत धनको हे कायद्या अंतर्गत कोणतेही प्राधिकृत यांच्याकरिता प्रॉक्युअरिंग कोणतेही मंजूरी आदी यांच्याकरिता प्रतिभूत मालमत्तेमधील कोणतेही त्रुटी/ करार/ चुकीचे अहवाल/ लघु अहवाल आदी जबाबदार नसतील.

१०. यशस्वी बोलीदारांचे इअर विक्री विचारात घेउन करण्यात येईल व इअर अयशस्वी बोलीदारांना परत करण्यात येईल.
इअरवर कोणतेही व्याज मिळनार नाही.

११. त्वरित म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या अगोदर जसे असेल तसे बोली रकमेच्या २५% (इअर संलग्न नंतर) जमा करणे आणि उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चितीपासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे. वरील नमूद नुसार विक्री किंमत चुकती करण्यास कसूर केल्यास इअर जमा केलेली सर्व रक्कम कोणत्याही सूचनेशिवाय जप्त करण्यात येईल, तथापि अपवादात्मक परिस्थितीमध्ये उर्वरित ७५% प्रदान करण्यासाठी वेळ वाढवून देणे हे कायद्याच्या तरतुदींनुसार खरेदीदार आणि तारण धनकोच्या दरम्यान लेखी मान्य केलेल्या अटी आणि शर्तीच्या अधीन राहील. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे स्वतःचे निर्देश राहतील.

१२. इच्छुक पक्षांनी कृपया मालमत्ता व अन्य तपशील पडताळणी करावी. प्रतिभूत धनको हे कायद्या अंतर्गत कोणतेही प्राधिकृत यांच्याकरिता प्रॉक्युअरिंग कोणतेही मंजूरी आदी यांच्याकरिता प्रतिभूत मालमत्तेमधील कोणतेही त्रुटी/ करार/ चुकीचे अहवाल/ लघु अहवाल आदी जबाबदार नसतील.

१३. एकदा का वरील नामित प्रदान पूर्ण झाले की प्राधिकृत अधिकारी खारेदीदाराच्या नावे स्थावर मालमत्तेची विक्री करण्याकरिता प्रमाणपत्र जारी करततील.

१४. खारेदीदार मालमत्तेच्या संबंधात ताब्यात असलेले लागू स्टॅम्प ड्युटीज/ अतिरिक्त स्टॅम्प ड्युटी/ हस्तांतरण प्रभार, मूल्य आदी तसेच सर्व वैधानिक/ अवैधानिक कर, थकबाकी, दर, असेसमेंट प्रभार, मूल्य आदी जमा करावे.

१५. उच्च बोली ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना मंजूरी व पुष्टी केली आहे. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे कोणतेही कारण न देता प्रस्ताव/ बोली वा सर्व कोणतेही लिलाव स्विकृत/ रद्द करण्याचा अधिकार राखून आहेत व स्थगित/ रद्द करण्याचा अधिकार राखून आहेत.

१६. बोलीदारांनी कृपया ई-लिलाव प्रक्रियेच्या विस्तृत अटी व शर्ती मार्फत जाहीर करावे व वेबसाइट **https://www.bankauctions.in** वर ई-लिलावामधील त्यांच्या बोली सादरीकरणापूर्वी उपलब्ध असतील.

१७. बोलीदारांनी त्यांच्या इच्छेनुसार बोलीदार यांच्याकरिता ई-लिलावामध्ये सहभागी होऊ शकतात व वैध ई-मेल आयडी प्राप्त करावा. ई-लिलावाच्या कसूर केल्यामुळे कायद्या नुसार प्रायव्हेट आधारावर मालमत्तेची विक्री करण्याचा अधिकार राखून आहे. प्राधिकृत अधिकारी/ प्रतिभूत धनको हे सदर सूचनेमधील कोणतेही त्रुटी, प्रभारित वा ओमिशनकरिता जबाबदार नाहीत.

१८. वरील विहित कोणत्याही जबाबदाऱ्यांकरिता कर्जदार यांनी जाहीर लिलावाकरिता सदर प्रसिद्धी तारखेपासून कोणत्याही वैही प्रदानाच्या तारखेपर्यंत पुढील व्याजासह थकित रक्केचे प्रदान करावे व सदर सरफैसी कायदा, २००२ च्या अनुच्छेद १३ (८) अंतर्गत प्रतिभूत धनको म्हणून प्रतिभूत मालमत्तेची भाडेकरार, जप्ती वा विक्री करावी.

दि. ०९ ऑगस्ट, २०२१
ठिकाण : मुंबई

प्राधिकृत अधिकारी
इंडिया रिसर्जन्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड